## डब्यांची जोडणी करून चाचणीस लवकरच सुरुवात

# ‘मेट्रो ३’साठी दुसरी गाडी मुंबईत दाखल

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** ‘कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेसाठी ३१ मेट्रो गाड्यांची गरज असून यापैकी दुसरी मेट्रो गाडी गुरुवारी मध्यरात्री मुंबईत दाखल झाली आहे. आठ डब्यांची ही गाडी आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथून मुंबईतील सारीपुत नगर येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाली आहे. येथे आठही डबे उतरविण्यात आले असून आता या डब्यांची जोडणी करून गाडीच्या चाचणीस सुरुवात करण्यात येणार आहे. नववर्ष सुरू होत असताना दुसरी गाडी दाखल झाल्याने मुंबईकरांसाठी नववर्षाची ही भेट ठरली आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) ३३.५ किमी लांबीच्या ‘मेट्रो ३’ मार्गिकेचे काम सुरू आहे. दोन टप्प्यात हे काम करण्यात येत असून यापैकी बीकेसी ते सीप्झ हा टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्याचे एमएमआरसीचे नियोजन आहे. त्यामुळेच या टप्प्याच्या आणि आरे कारशेडच्या कामाला वेग देण्यात आला आहे. तर दुसरीकडे या टप्प्यासाठी लागणाऱ्या मेट्रो गाड्या आंध्र प्रदेशातून मुंबईत आणून त्यांची चाचणी घेण्याच्या कामालाही प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळेच ऑगस्टमध्ये पहिली गाडी मुंबईत आणून तिची चाचणी सुरू केली आहे, तर आता दुसरी गाडीही मुंबईत आणण्यात आली आहे. गुरुवारी मध्यरात्री आठ डब्यांची दुसरी मेट्रो गाडी मुंबईत आली आहे. सारीपूत नगरमधील तात्पुरत्या कारशेडमध्ये हे डबे उतरविण्यात आले आहेत.

## मेट्रो गाडीची वैशिष्ट्ये

- आठ डब्यांची गाडी
- १८० मीटर लांब गाडी
- ३.२ मीटर रुंद गाडी
- एकूण प्रवाशी क्षमता २४००
- वेग ताशी ८५ किमी
- स्टेनलेस स्टीलचा वापर करण्यात आल्याने गाडी ३५ वर्षे टिकणार
- रिजनरेटिव्ह ब्रेकिंगमुळे सुमारे ३० टक्के विद्युत उर्जेची बचत होईल आणि चाकांची तसेच ब्रेक ब्लॉक्स इत्यादी उपकरणांची झीज कमी होईल
- पूर्णतः वातानुकूलित गाडी
- स्वयंचलित गाडी



## ३१ गाड्यांच्या बांधणीचे कंत्राट

एमएमआरसीकडून श्रीसिटीतील एका कंपनीला २०१७-२०१८ मध्ये देण्यात आले. २५१६ कोटींचे हे कंत्राट आहे. या कंत्राटानुसार श्रीसिटीत मेट्रो ३ साठीच्या गाड्यांची बांधणी सुरू आहे. श्रीसिटीतून पहिली गाडी याआधीच मुंबईत आली असून आता दुसरी गाडीही दाखल झाली आहे. मेट्रो ३ साठी ३१ गाड्यांची बांधणी करण्यात येत असली तरी पहिल्या टप्प्यासाठी, बीकेसी ते सीप्झसाठी नऊ मेट्रो गाड्यांची गरज आहे. यातील दोन गाड्या मुंबईत आल्या असून आता सात गाड्यांची प्रतीक्षा आहे. त्यामुळे या गाड्या टप्प्याटप्प्यात मुंबईत आणल्या जातील.